CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३२८ वा ▶ शनिवार दि. २३ सप्टेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

विधानसभा अध्यक्षांनी घटनात्मक पेच वाढवला : राऊत

मुंबई । सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना आमदारांच्या अपात्रतेवर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिलेत. त्यानंतर विधानसभा

अध्यक्ष राहुल नार्वेकर अचानक दिल्लीत दाखल झाल्यामुळे राज्यातील विरोधकांच्या शंकांना बळ मिळते, अशा शब्दांत शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नार्वेकर यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. यावेळी त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केला. नार्वेकर यांनी गत अनेक महिन्यांपासून हा घटनात्मक पेच वाढवून ठेवला आहे, असे म्हणाले.

न्यूज कॉलम

भावसार समाज विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आयोजित

धुळे । येथील भावसार समाज मंडळातर्फे रविवार दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता भावसार भवन येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महापौर प्रतिभा चौधरी या अध्यक्षस्थानी असतील. प्रमुख पाहुणे जिल्हा पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, सा.बां. विभागाचे अधीक्षक अभियंता विवेक नवले, उपायुक्त डॉ. संगिता नांदुरकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे. यावेळी समाजाचे माजी प्रमुख विश्वस्त योगेंद्र जुनागडे व विधी सल्लागार ॲड. महेंद्र भावसार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. उपस्थितीचे आवाहन प्रमुख विश्वस्त अशोक भावसार , समाज अध्यक्ष गोपिचंद पांडव व सर्व विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकारी मंडळ, महिला मंडळातर्फे करण्यात आले आहे.

मनपा विद्युत विभाग रात्रीही देणार सेवा

धुळे । गणेशोत्सवाच्या काळात शहर प्रकाशमान राहणार आहे. यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने कंबर कसली असून रात्रीही सेवा देण्यात येणार आहे. पथदिवे, हायमास्ट याबाबत काही अडचणी असल्यास ०२५६२-२८८३२५ या दूरध्वनी क्रमांकावर नागरिकांना तक्रार करता येणार आहे.

धुळ्यातील रामदेव बाबा नगरात घरफोडी करणारे चोरटे जेरबंद

धुळे । प्रतिनिधी

शहरातील मनमाड जीन व रामदेव बाबा नगरात घरफोडी करणार्या चोरट्यांना जेरबंद करण्यात आझादनगर पोलिसांना यश आले आहे. तीन चोरट्यांनी मिळून या घरफोड्या केल्याचे उघडकीस आले असून यातील दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून रोकड व दागिने मिळून ५२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दरम्यान, या गुन्ह्यातील एक आरोपी फरार असून त्याचा शोध जारी आहे.

आझादनगर पोलीस ठाणे हद्दीतील मनमाड जीन येथे दि.९ सप्टेंबर २०२३ रोजी स्वप्नील सुनिल गवळी यांचे घर फोडून कपाटातील सोने-चांदीचे दागिने तसेच ३० हजारांची रोकड असा एकूण ४७ हजारांचा मुद्देमाल चोरुन नेला होता. याप्रकरणी स्वप्नील गवळी यांनी आझादनगर पोलिसांत फिर्याद दाखल केली होती. त्यानुसार अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घरफोडीचा उलगडा होत नाही तोच १८ सप्टेंबर २०२३ रोजी रामदेव बाबा नगरात शेख नजीर शेख नदीर यांचे घर फोडल्याची घटना घडली. या घरातून चोरट्यांनी कपाटातील १० हजारांची रोकड, १९ हजार ६०० रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने असा एकूण २९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. याप्रकरणी शेख नजीर शेख नदीर यांच्या फिर्यादीवरुन आझादनगर पोलिसांत अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. एका आठवड्यातच घरफोडीचे दोन गुन्हे दाखल झाल्यानंतर आझादनगर पोलीस ठाण्याच्या शोध पथकाने गुन्ह्याच्या तपासाला वेग दिला. सदर गुन्ह्याचा तपास करत असताना पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, वरील दोन्ही गुन्हे हे साहील शाहा रा. रमजानबाबा नगर, धुळे याने त्याचे इतर साथीदार यांच्या मदतीने केलेले आहेत. त्यानुसार पीआय नितीन देशमुख यांनी शोध पथकातील सपोनि पाटील व अमलदार यांना पुढील कारवाई करण्याबाबत आदेशित केले. शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच साहील सत्तार शाहा, रा. रामदेव बाबा नगर, धुळे यास त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्याला विचारपुस केली असता त्याने वरील दोन्ही गुन्हे त्याचे इतर दोन साथीदारांच्या मदतीने केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याचा एक साथीदार तौसिफ सलीम शाहा रा. रमजान बाबा नगर, धुळे यास देखील ताब्यात घेण्यात आले. तर तिसरा साथीदार हा फरार असुन त्याचा शोध सुरु आहे. ताब्यात घेतलेल्या दोघा आरोपींकडून दोन्ही घरफोड्यांमध्ये चोरीस गेलेल्या मालापैकी रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने असा एकुण रुपये ५२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश आले आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे तसेच धुळे शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, सपोनि संदीप पाटील, सफी प्रकाश माळी, पोहवा. योगेश शिरसाठ, पोहवा. मुक्तार मन्सुरी, पोहवा. शांतीलाल सोनावणे, पोना. गौतम सपकाळे, संदीप कढरे, पोना योगेश शिंदे, यांच्या पथकाने केली.

५२ हजाराचा मुद्देमाल जप्त

धुळ्यातील आझादनगर पोलिसांनी धुळे शहरातील मनमाड जिन आणि रामदेव बाबानगर परिसरात घरफोड्या करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. या दोघांनी धुळे शहरात केलेले २ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असून, त्यांच्याकडून सुमारे ५२ हजार ३०० रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

गुजरातहून नाशिकमध्ये हलवा आणि खडोल मिठाईची वाहतूक

एफडीएची मोठी कारवाई

नाशिक । प्रतिनिधी

एकीकडे गणेशोत्सवाचे दिवस असून आगामी काळात अनेक सण उत्सव येऊ घातले आहेत. अशातच नाशिक शहरात मात्र मिठाईच्या नावावर नागरिकांची फसवणूक केली जात असल्याचा प्रकार पुन्हा समोर आला आहे. आता गुजरातहून नाशिकमध्ये येत असलेला हलवा आणि खडोल या मिठाईत भेसळ असल्याच्या संशयाने अन्न व औषध प्रशासन विभागाने साठा जप्त केला आहे.

गणेशोत्सवात दुग्धजन्य पदार्थांसह मिठाईला असलेल्या मागणीचा फायदा उठवत शहरातील काही विक्रेत्यांकडून खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करण्यात येत आहे. ही भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाच्या सहकार्याने नाशिक- पेठ रस्त्यावर एका वाहनाचा संशय आल्याने तपासणी केली. यात गुजरातमधून सणासुदीच्या काळात हलवा आणि खडोल या मिठाईचा साठा वाहनातून नाशिक शहरात विक्रीसाठी आणण्यात येत होता. पथकाने ५० पिशव्यांमधील साठ्याची वाहनातच तपासणी केली. अन्न पदार्थाच्या वाहतुकीचा परवाना संबंधितांकडे आढळून आला नाही. या कारवाईतून सुमारे दोन लाख ३९ हजार ६०० रुपयांचा एक हजार १९८ किलो हलवा आणि ६२ हजार ५८० रुपयांचा खडोला असा एकूण तीन लाख दोन हजार १८० रुपयांचा खाद्यसाठा जप्त करण्यात आला. सण उत्सवाच्या काळात मलई पेढे, मलई बर्फी किंवा ईतर मिठाईचे पदार्थ खरेदी करत असाल तर जरा काळजी घ्या असं म्हणण्याची वेळ आता आली आहे कारण दुधाच्या नावाखाली विक्री होणाऱ्या या मिठाईत दुधाचा वापर न करता गुजरातच्या एका पदार्थाचा वापर केला जात असल्याचा अन्न व औषध प्रशासन विभागाला संशय असून गेल्या काही दिवसात हा पदार्थ मोठ्या प्रमाणावर जप्तही करण्यात आला आहे. यासोबतच गेल्या दीड महिन्यातच प्रशासनाचे २१ छापे आणि त्यात समोर आलेली माहिती नक्कीच चिंता वाढवणारी आहे. गेल्या काही दिवसात नाशिकमध्ये अन्न व औषध प्रशासन विभाग आणि नाशिक पोलिसांनी संयुक्तरित्या केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणावर हे पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे गेल्याच आठवड्यात १५ सप्टेंबरला एका खासगी ट्रॅव्हल्सच्या बसमधून हे पदार्थ जप्त करण्यात येऊन त्यानंतर नाशिक शहरातील विविध विक्रेत्यांकडून देखील हे पदार्थ ताब्यात घेण्यात आले होते.

घरातून तीन लाखांच्या दागिन्यांसह रोकड लंपास

धुळे । घरी कुणीही नसताना चोरट्यांनी संधी साधली आहे. चोरट्याने बंद घराचा कडीकोंडा व कुलूप तोडून जवळपास तीन लाखांहून अधिकचा सोन्या-चांदीचे दागिन्यांसह दहा हजार रुपये रोकड चोरून पोबारा केल्याची घटना शिरपूर येथील सुभाष कॉलनी येथे उघडकीस आली आहे. संपूर्ण परिवार पुण्याला गेला असल्याने हि संधी साधत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरातून दागिने व रोख रक्कम लांबविली आहे.

खंडोजी महाराजांचा नामसप्ताह यात्रोत्सव सुरू

पिंपळनेर । प्रतिनिधी

येथील ऐतिहासिक १९५ व्या खंडोजी महाराज यात्रोत्सव सुरू झाला असून या यात्रोत्सवाची पश्चिम पट्ट्यातील खेडोपाडी व पिंपळनेर सह पूर्ण परिसरात आतुरतेने वाट पाहत असतात. समर्थ सद्गुरू खंडोजी महाराज यांच्या १९५ व्या पुण्यतिथी निमित्ताने यात्रोत्सवाची सुरुवात विठ्ठल मंदिर संस्थानचे मठाधिपती योगेश्वर महाराज देशपांडे यांच्या समाधी दर्शनाने झाली त्यानंतर पायदळी सोंग नाचवण्यासाठी विविध सांस्कृतिक मंडळांनी विठ्ठल मंदिर येथे हजेरी देऊन संपूर्ण शहरात मिरवणुकीने सोंगे नाचवण्यात आली.

या पायदळी सोंग पाहण्यासाठी आबालवृद्ध तरुण तरुणी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. त्यानंतर मंदिरात काकड आरतीने गुलालाची उधळण झाली व यात्रेला सुरुवात झाली. सुभाष चौक येथे युवा संघर्ष मित्र मंडळ व भोईगल्ली येथे भोईराज मित्र मंडळ व नाना चौक येथील कलियुग सांस्कृतिक मंडळ यांच्या वहन देखाव्याचे उदघाटन साक्री तालुक्याचे युवा नेतृत्व प्रवीण बापू चौरे व जि प कृषी सभापती हर्षवर्धन दहिते यांच्या हस्ते ट्रॅक्टर वहन उदघाटन करण्यात आले. दीपप्रज्वलन हभप योगेश्वर महाराज देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले व वहन पूजन उपविभागीय अधिकारी साजन सोनवणे, माजी जि प सदस्य ज्ञानेश्वर एखंडे व पिंपळनेर पोलिस ठाण्याचे प्रभारी श्रीकृष्ण पारधी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विठ्ठल मंदिर संस्थान येथून सद्गुरू खंडोजी महाराज यांच्या पालखीची मिरवणूक निघाली या पालखीचे जागोजागी स्वागत करण्यात आले. हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक बाजारपेठेतील मशिदीबाहेर याहू जहागीदार व मुस्लिम बंधवातर्फे स्वागत करण्यात आले. भारतीय जनता पार्टी तर्फे स्वागत व पूजन साक्री तालुका विधसनसभा प्रभारी इंजि मोहन सूर्यवंशी,व कार्यकर्त्या तर्फे करण्यात आले. यात्रेला परिसरातील भाविकांची प्रचंड गर्दी असून कुस्त्याची दंगल व दि २४ रोजी नृत्यस्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. हा यात्रोत्सव शांतता पूर्ण पाडण्यासाठी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड,विभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे,पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी श्रीकृष्ण पाराधी, पी एस आय भूषण शेवाळे, पी एस आय भाईदास मालाचे, पी एस आय अमित माळी सर्व पोलीस बांधव व अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.

रेल्वे बोगद्यात हॉटेल कर्मचाऱ्याला लुटले

धुळे । प्रतिनिधी

शासकीय दुध डेअरी परिसरातील रेल्वे बोगद्यातून जाणार्या एका हॉटेल कर्मचार्याला लुटल्याची घटना काल रात्री ९ वाजेच्या सुमारास घडली. यावेळी लुटारुंनी कर्मचार्याकडील दुचाकीसह रोकड व मोबाईल चोरुन नेल्याची चर्चा आहे. या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

रेल्वे प्रशासनाने रेल्वे गेट बंद केलेअसून सुमारे २०० मीटर अंतरावर बोगदा तयार केला आहे. परंतु, या बोगद्यात रात्रीला पथदिव्यांअभावी अंधार राहत असल्याने हा बोगदा धोकेदायक ठरत आहे. या ठिकाणी अपघाताला निमंत्रण मिळत असतानाच आता लुटारुही येथे डाव साधत असल्याचे चित्र आहे. कोणी एकटा वाहनधारक घावल्यास त्याला टार्गेट केले जात आहे. काल रात्री ९ वाजेच्या सुमारारस एक हॉटेल कर्मचारी ॲक्टीवाने या बोगद्यातून जात असताना लुटारुंनी त्याला अडवून मारठोक करुन त्याच्याकडील ॲक्टीवा, पाच हजार रुपये व मोबाईल चोरुन नेल्याचे समजते. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते प्रवीण अग्रवाल यांनीघटनास्थळी धाव घेतली. यावेळी शहर पोलीस ठाण्याचे पीआय आनंद कोकरे हे देखील घटनास्थळी दाखल झाले होते. परंतु, याप्रकरणी अद्याप पोलिसांत तक्रार दाखल झालेली नाही. त्यामुळे कर्मचार्याचे नाव समजू शकलेले नाही. सदर कर्मचारी हा हॉटेल गोल्डन लिफ चा कर्मचारी असल्याचे समजते.

जिल्ह्यात पावसाची जोरदार हजेरी

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यात काल सायंकाळी पाचच्या सुमारास विजांच्या कडकडाटांसह जोरदार पाऊस कोसळला. निफाड तालुक्यातही पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकरी सुखावला आहे. मुसळधार पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. अवघ्या काही मिनिटांमध्ये रस्ते व शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले दिसून आले.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात उकाडा जाणवत होता. मात्र, पाऊस हुलकावणी देत होता. शुक्रवारी सकाळपासूनच पाऊस येण्याचा अंदाज होता. दुपारनंतर मात्र उकाड्यात अधिकच वाढ झाली होती. अखेर सायंकाळी पाचच्या सुमारास मुसळधार पावसाने हजेरी लावली. निफाडला शुक्रवारचा आठवडे बाजार असल्याने भाजीपाला विक्रेते, व्यावसायिक व नागरीकांची एकच तारांबळ उडाली. अनेक दिवसांपासून गोदाकाठ भागात दडी मारलेल्या पावसाने मागील आठवडाभरात रिमझिम पडायला सुरुवात झाली होती. तर शुक्रवारी सायंकाळी पावसाने दमदार हजेरी लावत चांगलीच बॅटिंग केली असल्याने शेतकरी राजाच्या चेहऱ्यावर एकच आनंद पहायला मिळत आहे. दरम्यान, निफाड तालुक्यातील वनसगाव, उगाव, कुंदेवाडी, रौळस, पिंपरी, कारसूळ, लोणवाडी, दावचवाडी, पिंपळगाव बसवंत, पालखेड मिरची आदी गावांमध्ये मुसळधार पाऊस झाला आहे. मान्सून सुरू होऊन जवळपास तीन महिन्याहून अधिक काळ उलटून गेल्यानंतरही निफाडच्या दक्षिण भागातील गोदाकाठावर पावसाची अवकृपा होती. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांच्या डोक्यावर चिंतेचे ढग वाहत होते. शेतकऱ्यांसमोर जनावरांचा चारा पिण्याचे पाणी तसेच शेतात पेरलेली सोयाबीन मका व इतर पिके डोळ्यासमोर पाण्यावाचून वाळून जात असल्याने चिंतेत नेहमी वाढ होत होती. तर काही शेतकऱ्यांनी दुबार पेरणीदेखील केली होती. शुक्रवारी रात्री करंजगाव, भेंडाळी, भुसे, चापडगाव, मांजरगाव, म्हाळसाकोरे, खानगाव थडी, तारुखेडले आदी गावांमध्ये दमदार सरी बरसल्या. त्यामुळे तूर्तास माना टाकलेली पिके, जनावरांच्या पाणी व चाऱ्याचा प्रश्न सुटणार आहे.

नशिकमध्ये जर्मनीहून आलेल्या गौराईचा राजेशाही थाट, दोन लाखांचा साज

आली गौराई आली, सोनं पावलांनी आली

नाशिक । प्रतिनिधी

गणपतीसोबतच गौरीचेही सोनपावलांनी आगमन झाले असून घरोघरी अतिशय उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. नाशिकच्या शहाणे कुटुंबीयांनी थेट जर्मनीहून महालक्ष्मीच्या मूर्ती मागवल्या असून घरातच राजस्थान पॅलेसची अनोखी प्रतिकृती साकारत महालक्ष्मीची स्थापना करण्यात आली आहे. जवळपास दोन लाख रुपयांचा साज शृंगार या गौरींना चढविण्यात आला आहे. अत्यंत सुंदर, देखणं आणि अनोखं असं रूप या गौराईचं पाहायला मिळतं आहे.

नाशिकच्या शहाणे कुटुंबियांनी आपल्या घरी गौरी-गणपतीची स्थापना केली आहे. विशेष या गौराई महाराष्ट्रात तयार केल्या नसून थेट जर्मनीत महालक्ष्मीच्या मूर्ती तयार केल्या आहेत. यंदा शहाणे कुटुंबीयांनी राजस्थान पॅलेसचा देखावा साकारला असून त्यात महाराणी सारखा लूक गौराईला देण्यात आला आहे. त्यामुळे त्या विशेष लक्ष वेधून घेत आहेत. नाशिक शहरातील मेनरोड परिसरात वास्तव्य करणारे शहाणे कुटुंबीय गेल्या अनेक वर्षांपासून गौराईची स्थापना करतात. मागील दोन वर्षांपासून पश्चिम जर्मनीतील एका कारागिराने चार महिने मेहनत घेत या मूर्ती साकारल्या आहेत. फायबरच्या जरी वाटत असल्या तरी त्या शिवण या भरीव लाकडापासून बनवण्यात आल्या आहेत. एका गौरीचे वजन हे जवळपास ८० किलो एवढे असून त्या १०० वर्ष टिकतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या गौराईंचे केस, डोळे, कान, ओठ हे अत्यंत हुबेहूब असे आहेत. लक्ष्मीचे डोळे पाहताच आपल्याला जिवंत देखावा असल्याचा भास होतो. शहाणे कुटुंबीयांनी राजस्थान पॅलेसचा देखावा उभारला असून त्यानुसार सेट उभारण्यात आला आहे. या कामासाठी जवळपास पाच ते सहा दिवसांचा वेळ लागला आहे. तसेच लक्ष्मीच्या मूर्ती सोडल्या तर सर्व सजावट शहाणे कुटुंबीयांनी केली आहे. लक्ष्मीचा साज शृंगार हा शहाणे कुटुंबीयांनी केला असून मूर्तीवर सोने चांदीचे जवळपास ५ किलोहून अधिक दागिन्यांची आभूषणे असून मंगळसूत्र, राणीहार, कंबरपट्टा अशा प्रत्येक दागिन्यांनी महालक्ष्मी साकारण्यात आल्या आहेत, याला जवळपास दोन लाख रुपयांचा खर्च झाल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. त्यामुळे अत्यंत सुंदर, देखणं आणि अनोखं असं रूप या गौराईचं पाहायला मिळतं आहे. लग्न झाल्यानंतर पहिल्यांदाच माहेरी आलेल्या माहेरवाशिणीच्या चेहऱ्यावर जो आनंद बघायला मिळतो, अगदी तसाच आनंद या गौरीकडे बघितल्यावर होतो.

राजस्थान पॅलेसचा देखावा

सोनपावलांनी लाडक्या गौरीचे आगमन झाले असून शहाणे कुटुंबीयांनी अतिशय सुंदररित्या देखावा साकारण्यात आला आहे. राजस्थान पॅलेसचा देखावा उभारला असून राणीच्या रुपात गौरी बसविण्यात आली आहेत. तसेच राजस्थान पॅलेसमध्ये जशी सजावट असते, तशी हुबेहूब प्रतिकृती साकारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. लक्ष्मीचा डोक्यावरील टोप हा हॅण्डमेड असून जव्हेरी दागिन्यांचा वापर करण्यात आला आहे. एकूणच गौराईंना राजेशाही लूक देण्यात आला आहे.

अजित पवार गटाकडून शरद पवार गटातील ११ पैकी १० आमदारांविरोधात याचिका

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना पक्षातील फुटीनंतर आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकेवर कारवाई सुरू असताना दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसमधील शरद पवार आणि अजित पवार गटामधील संघर्ष आता तीव्र होण्याची चिन्हं आहेत. शरद पवार गटाकडून अजित पवार गटाच्या विरोधात कारवाईला वेग आल्यानंतर आता अजित पवार गट देखील शरद पवार गटाविरोधात आक्रमक झाला आहे. याचिकेत समाविष्ट केलेल्या आमदारांची नावे 'एबीपी माझा'च्या हाती लागली आहेत. अजित पवार गटाकडून शरद पवार यांच्या गटातील आमदारांविरोधात विधिमंडळात याचिका दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे शरद पवार गटातील ११ पैकी १० आमदारांविरोधात याचिका दाखल करण्यात आली असून एका आमदाराचे नाव वगळण्यात आले आहे.

अजित पवार गटाच्या वतीने गुरुवारी विधिमंडळात शरद पवार गटातील दहा विधानसभेच्या आमदारांविरोधात आणि विधानपरिषदेच्या तीन आमदारांच्या विरोधात अपात्रतेची कारवाई करणारी मागणी करणारी याचिका दाखल करण्यात आली. पक्ष विरोधी कृती केल्यामुळे सदर आमदारांवर कारवाई करावी अशी मागणी अजित पवार गटाच्या वतीने करण्यात आली आहे.

गुणवत्ता आणि बाजारीकरण

वैद्यकीय पदव्युत्तर पदवी (पीजी) अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेत शून्य पर्सेंटाइल मिळाले, तरी प्रवेश देण्याचा राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेचा (एनएमसी) निर्णय हा शिक्षणाच्या बेसुमार बाजारीकरणाचा परिपाक आहे. लाखो रुपये शुल्क आकारणाऱ्या खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदव्युत्तर वर्गाच्या जागा रिकाम्या राहू नयेत, या कारणासाठी पात्रतेची अट शिथील करण्यात आल्याचे कारणही त्यामागे आहे.

वैद्यकीय शिक्षणामागील अर्थकारणाचा, शिक्षणसम्राटांनी केलेल्या गुंतवणुकीच्या परताव्याचा मुद्दा यामागे आहे. प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात जागा उपलब्ध करण्यासाठी खासगीकरणावर भर देऊन 'मागणी तसा पुरवठा' हे तत्त्व शिक्षण क्षेत्राला लागू केल्यानंतर बाजारपेठेचे नियम लागू होणारच होते. खासगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली त्याला आता चार दशकांहून अधिक काळ लोटला. या काळात खासगी महाविद्यालयांची आणि त्यांमधील जागांची संख्या इतकी वाढली, की आता जागा जास्त आणि इच्छुक विद्यार्थी कमी असे उलटे समीकरण तयार झाले. वास्तविक, वैद्यकीय पदवीच्या तुलनेत पदव्युत्तरच्या जागा कितीतरी कमी आहेत. देशभरात वैद्यकीय पदवीच्या सुमारे एक लाख; तर पदव्युत्तर वर्गाच्या जागा ६५ हजारांच्या घरात आहेत. त्यामुळे पदव्युत्तर प्रवेशासाठी अजूनही चुरस आहे. राष्ट्रीय पात्रता परीक्षेद्वारे (नीट पीजी) या वर्गांना प्रवेश दिला जातो. किमान पन्नास टक्के पर्सेंटाइल मिळविलेले, म्हणजे परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी निम्म्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक गुण असलेले विद्यार्थी पात्र ठरतात. आता पर्सेंटाइलची अटच काढून टाकल्याने प्रवेश परीक्षेला बसलेले सर्वच विद्यार्थी पात्र ठरतील. 'या निर्णयामुळे गुणवत्तेचे काय होईल, पात्रता परीक्षेत चांगले गुण मिळवू न शकलेले प्रत्यक्ष अभ्यासक्रमात कशी चांगली कामगिरी करतील, ते पुढे चांगले डॉक्टर कसे होतील,' असे प्रश्न काही पालकांकडून उपस्थित होत आहेत. हे प्रश्न चुकीचे नाहीत; परंतु त्यांना आता फारसा अर्थ राहिलेला नाही. वैद्यकीय शिक्षणाचे खासगीकरण झाले तेव्हाही हे प्रश्न विचारले गेले होते. प्रवेश मिळविण्याइतपत गुण असूनही केवळ पैसे नसल्यामुळे वैद्यकीय शिक्षणाला मुकलेले अनेक विद्यार्थी पूर्वीही होते आणि आताही आहेत. कमी गुण मिळवूनही पैशाच्या जोरावर डॉक्टर झालेल्यांची समाजाला आता सवय झाली आहे. त्यांपैकी काहींनी, आपल्या शिक्षणासाठी केलेल्या गुंतवणुकीची दामदुप्पट वसुली करण्यासाठी महागडी रुग्णालये सुरू केली असून, तिथे रुग्णांची रांग आहे. गुणवत्तेच्या मुद्द्यातील फोलपणा यातून अधोरेखित होतो. वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र असलेले; परंतु पैसे नसलेल्या घटकांमधील विद्यार्थ्यांसाठी सरकारने अधिक महाविद्यालये काढणे आवश्यक आहे. गेल्या आठ वर्षांत पदव्युत्तरच्या जागा ३१ हजारवरून ६५ हजारांवर गेल्या हे खरे; त्यामध्ये सरकारी महाविद्यालयांमधील जागा अधिक आहेत हेही खरे; परंतु ही संख्या आणखी वाढायला हवी. डॉक्टरांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात राहण्यासाठी सरकारला यासाठी गुंतवणूक करावी लागेल.वैद्यकीय शाखेप्रमाणेच अभियांत्रिकीच्या प्रवेशाच्या बातम्याही सध्या चर्चेत आहेत. यांत्रिकी, स्थापत्य आदी अभियांत्रिकी पारंपरिक शाखांना विद्यार्थी मिळत नसल्याची, काही महाविद्यालयांत या शाखांत एकाही विद्यार्थ्याने प्रवेश न घेतल्याची बातमी आहे. ही बाबही आश्चर्यकारक नाही. अभियांत्रिकीच्या जागा रिकाम्या राहण्यास सुरुवात होऊनही आता दहा-बारा वर्षे झाली. देशात अभियांत्रिकीच्या सुमारे चौदा लाख जागा असून, त्यांपैकी चार ते पाच लाख जागा दरवर्षी रिक्त राहतात. एकट्या महाराष्ट्रात सव्वा दोन लाखांहून अधिक जागा आहेत; त्यांपैकी एक लाख जागा गेल्या वर्षी रिकाम्या होत्या. संगणक तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, दूरसंचार तंत्रज्ञान या क्षेत्रांत नवनवीन संशोधन विकसित होत असल्याने या शाखांना अधिक मागणी आहे. स्थापत्य किंवा यांत्रिकी या शाखा अर्थातच महत्त्वाच्या आहेत. प्रमुख महाविद्यालयांमध्ये त्या जागांनाही मागणी असतेच; परंतु इतरत्र विद्यार्थी त्याकडे पाठ फिरवतात. शिक्षण आणि उद्योग यांची योग्य सांगड घातली गेली तर कदाचित ही स्थिती बदलण्यास मदत होईल. अन्यथा दरवर्षी हे असेच चालू राहील.

डेक्कन ओडिशीमुळे पर्यटनास मिळणार गती!

भारतात रेल्वेचे मोठ्या प्रमाणात जाळे पसरले आहे, जे जगभरात दुसऱ्या क्रमांकाचे मानले जाते. केवळ हे जाळेच निर्माण झाले नाही तर रेल्वे गाड्यांच्या निर्मितीबरोबरच सेवांचाही विस्तार झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात रेल्वेच्या विकासाला अधिक गती मिळाली, हे मान्यच केले पाहिजे.

अर्थात अन्य सरकारांच्या काळात काहीही झाले नाही, असेही म्हणता येणार नाही. काँग्रेस पक्षाचा कार्यकाळ देशातील सत्तेवर सर्वाधिक राहिलेला आहे. त्यामुळे त्यांच्या काळात अनेक योजना आखण्यात आल्या. त्या कालांतराने पूर्ण होत आहेत. कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यावर आपल्या कल्पनेनुसार आणि नियोजनानुसार काम करीत असते. २०१४ पासून देशाची सत्तासूत्रे नरेंद्र मोदी यांच्या भाजप सरकारच्या हातात असून विकास पुरुष या उपाधीप्रमाणे सगळ्यांचा विकास होताच आहे. शिवाय आपल्या विकास पुरुष या उपाधीला साजेसे असेच काम पंतप्रधान मोदी करीत आहेत. मुंबई सारख्या महानगरात मोनो रेल आली. त्यापाठोपाठ मेट्रो रेल्वे सुरू झाली. या मेट्रो रेल्वेचा मुंबईत मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. मुंबईपाठोपाठ पुणे आणि नागपूर या शहरात मेट्रो सुरू झाली. पुढे औरंगाबाद, नाशिक शहरात अशी मेट्रो सुरू झाल्यास नवल वाटू नये, असो.

दिवसेंदिवस रेल्वेचा विस्तार आणि विकासही होत आहे, ही एक भारतीयांच्या दृष्टीने समाधानाची बाब आहे. देशभरात जवळपास ७५ 'वंदे भारत' सुरू करण्याचे धोरण मोदी सरकारने आखलेले आहे. त्यापैकी जवळपास १५ वंदे भारत गाड्या देशभरात सुरू झाल्या आहेत. महाराष्ट्रात सध्या मुंबई-शिर्डी, मुंबई-सोलापूर आणि मुंबईहून

कोकणात ही गाडी सुरू करण्यात येऊन प्रवाशांना चांगली आरामदायी सेवा दिली जात आहे. 'वंदे भारत'प्रमाणे अशा प्रकरच्या अन्य नावाने गाड्या धावत आहेत, हे भारताच्या दृष्टीने प्रगतीचे पाऊल आहे, असेच म्हटले पाहिजे. अशीच एक गाडी जी परदेशी पर्यटक आणि भारतीय पर्यटकांसाठी सुरू आहे. दरम्यानच्या काळात या नूतनीकरण कामासाठी या गाडीची सेवा खंडित होती.

आता पूर्णपणे नूतनीकरण करण्यात येऊन अत्यंत आधुनिक आणि परदेशी गाड्यांना टक्कर देईल, अशी 'डेक्कन ओडिशी' या गाडीची सेवा पूर्ववत सुरू झाली आहे. अत्याधुनिक आणि पंचतारांकित सोई-सुविधायुक्त अशी आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिलेली डेक्कन ओडिशी ट्रेन २.० नव्या रूपात धावण्यास सुरू झाली आहे. डेक्कन ओडिसी २.० या गाडीचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, फलाट क्रमांक १८ येथून गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी २ वाजता विधानसभेचे अध्यक्ष ॅड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी-शर्मा, भारतीय रेल्वेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत झाला. मान्यवरांना घेऊन या गाडीने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते ठाणे असा प्रवास केला.

देशातील प्रसिद्ध ४ शाही रेल्वेपैकी एक असणारी आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिलेली डेक्कन ओडिसी ट्रेन २.० ही नव्या रूपात पुन्हा पर्यटकांसाठी खुली झाली आहे. या गाडीमध्ये उच्च दर्जाच्या सोयी-सुविधा देण्यात येतात. सन २००४ ते २०२० पर्यंत या आलिशान व आरामदायी ट्रेनला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. मात्र, सध्या डेक्कन ओडिसी ट्रेन अत्याधुनिक सोयी-सुविधांनी पुन्हा पर्यटकांच्या सेवेकरिता सुरू झाली आहे. या नूतनीकरण करण्यात आलेल्या डेक्कन ओडिसी सहलींमध्ये महाराष्ट्र व्यतिरिक्त देशातल्या अन्य राज्यामधील पर्यटन स्थळांचाही समावेश करण्यात आला आहे. या गाडीमुळे पर्यटनाच्या माध्यमातून रेल्वेला महसूल तर मिळणारच आहे. शिवाय परदेशी पर्यटकांची मोठी सोय होणार आहे. देशभरात पर्यटनाची मोठी स्थळे आहेत.

आग्र्याचा ताजमहल, दिल्लीचा कुतुबमिनार आणि लाल किल्ला, नवे संसद भवन आणि दिल्ली राजधानीचे महत्त्व म्हणून सगळ्यांना आकर्षण आहेच. बिहारमधील बौद्धगया, लुंबिनी, सारनाथ, उत्तर प्रदेशातील बनारस, लखनऊ, प्रयागराज, अयोध्या आदी ठिकाणे, उत्तराखंड, औरंगाबादचे जगप्रसिद्ध अजिंठा लेणी आणि कैलाश लेणे, बिबी का मकबरा, देवगिरीचा किल्ला अशी भारतात कितीतरी ठिकाणे जी पर्यटन स्थळे म्हणून प्रसिद्ध आहेत. या सर्व पर्यटन स्थळांना डेक्कन ओडिशी या पर्यटक गाडीतून प्रवास करून पर्यटकांना पर्यटनाचा आनंद मिळवता येणार आहे. एकूणच भारतीय रेल्वे परदेशी रेल्वेप्रमाणे अत्याधुनिक स्वरूपात तयार करण्यात येत असून उच्च दर्जाच्या सुविधा प्रदान करण्यात येत असल्याने भारतीय रेल्वेचा अधिक विकास होत आहे, यात कोणतीही शंका नाही. रेल्वेच्या विकासाबरोबरच देशाची प्रगती होत आहे, ही मोठीच समाधानाची बाब आहे.

जागो ग्राहक जागो !

शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये असे म्हणतात, पण याची दुसरी बाजू सहसा कुणी सांगत नाही की आपली बाजू सत्याची असेल तर अवश्य चढावी आणि न्याय मिळाल्याशिवाय उतरू नये. जशा आपल्याकडे न्यायिक व्यवस्थेच्या पायऱ्या आहेत तशाच ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सुद्धा पायऱ्या आहेत. यात त्रिस्तरीय व्यवस्था असून अनुक्रमे जिल्हा पातळी, राज्य पातळी आणि राष्ट्रीय पातळीवर ग्राहकांची बाजू ऐकून न्याय दिला जातो.

तक्रारीची पार्श्वभूमी व तथ्ये : ही तक्रार ०२.०६. २०१६ च्या राज्य तक्रार निवारण मंचाच्या आदेशाविरुद्ध दाखल झाली. तक्रारदाराच्या मुलीने प्रतिवादी शाळेच्या माध्यमातून १२वीची परीक्षा उत्तीर्ण केली आणि 'बदली दाखल्यासाठी' व अनामत रकमेच्या परताव्याची शाळेकडे अर्ज केला असता शाळेने असा दाखला देण्याआधी रु. १०००० भरण्याची अट घातली. संस्थेच्या अशा पवित्र्यामुळे त्या मुलीला २०१३-१४ मध्ये दाखला मिळाला नाही, परिणामी तिला पुढील उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेता आला नाही. जिल्हा तक्रार निवारण मंचाकडे तक्रारदाराने नुकसानभरपाई म्हणून रु. ४,५०,०००/- चा दावा दाखल केला. यावर संस्थेने कांगावा करत अर्जदाराने संपर्कच केल्याचे नाकारले. जिल्हा मंचाने या तक्रारीची दखल घेत अर्जदाराला १५ दिवसांचे आत बदली दाखला, चारित्र्य प्रमाणपत्र देण्याची सूचना केली. तसे न केल्यास रु. १०००० चा दंड भरण्यास बजावले. जिल्हा मंचाच्या या निवाड्याने समाधान न झाल्याने तक्रारदाराने राज्य तक्रार निवारण आयोगाकडे अपील केले, परंतु राज्य निवारण आयोगाने जिल्हा मंचाचा निवाडा ग्राह्य धरला. तक्रारदाराने शेवटी राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे सुधारित अपील दाखल केले.

राष्ट्रीय आयोगाने निवाडा देताना ग्राह्य धरलेला मुख्य मुद्दा हा की शाळेने त्यांच्या सेवेत कसूर केली आहे. प्रतिवादीच्या चुकीने मुलीला २०१३-१४ या वर्षांत दाखला न मिळाल्याने पुढील शिक्षण घेता आले नाही व तिचे एक शैक्षणिक वर्ष फुकट गेले. यामुळे तिला मिळणारी नोकरी, बढती यावर सुद्धा पर्यायाने एक वर्षांचा परिणाम झाला आहे. जिल्हा मंचाने तसेच राज्य आयोगाने निवाडा करताना या गोष्टीचा विचारच केलेला नाही, ज्यामुळे नुकसानभरपाई रक्कम सुद्धा योग्य नाही. सबब राज्य निवारण आयोगाचा आदेश कायम करता येत नाही. राष्ट्रीय आयोगाने प्रतिवादीस रु ५०००० तक्रारदाराला एका महिन्याच्या आत देण्याच्या आदेश देताना असेही म्हटले की यात प्रतिवादीने कसूर केल्यास तक्रारदाराने जिल्हा मंचाच्या माध्यमातून वसुली करावी.

तक्रारीची पार्श्वभूमी व तथ्ये : वेल्स ग्रुप ऑफ मेरिटाईम कॉलेज ही संस्था समुद्री विज्ञान या विषयात उच्च राष्ट्रीय पदविकेचा अभ्यासक्रम चालवते. तक्रारदाराने २००५-२००७ या शैक्षणिक कालावधीसाठी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. तक्रारदाराचा आक्षेप हा होता की, या अभ्यासक्रमाला भारत सरकारची मान्यता नसल्याबद्दल या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या अभ्यासक्रम माहिती पत्रकात कुठेही नमूद केले नाही. परिणामी हा अभ्यासक्रम पूर्ण करून सुद्धा या तक्रारदारास 'कन्टीनुएस डिस्चार्ज सर्टिफिकेट' मिळू शकले नाही. आपल्याकडे जसे पासपोर्टसारखे ओळखपत्र असते तसे हे सीफेअरर म्हणजे समुदात काम करणाऱ्याचे त्या त्या देशाने दिलेले ओळखपत्र असते, असे प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासनाच्या डायरेक्टर जनरल ऑफ शिपिंगची मान्यता नसल्याने तक्रारदाराने याबाबत जिल्हा मंचाकडे नुकसानभरपाईसाठी तक्रार दाखल केली. यावर उत्तर देताना प्रतिवादीने तक्रारदाराचा दावा खोडला व सांगितले की, या तक्रारीत काही तथ्य नसून आम्ही हायर नॅशनल डिप्लोमा इन नौटिकल सायन्सचे प्रमाणपत्र दिले आहे, शिवाय हा अभ्यासक्रम इंग्लंडमधील त-चएढ या संस्थेने प्रमाणित केलेला आहे. जिल्हा मंचाने यावर निवाडा करताना तक्रारीची योग्य दखल घेऊन तक्रारदाराने भरलेली रु. ८,५०,००० ची फी, अधिक नुकसानभरपाई रु. ५०,००० आणि दाव्याचा खर्च रु. २०,००० इतकी रकम तक्रारदारास देण्याचा आदेश दिला.

प्रतिवादीने यावर राज्य आयोगाकडे अपील केले जे त्या आयोगाने फेटाळले. पुन्हा प्रतिवादीने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे दाद मागितली असता राष्ट्रीय आयोगाने विचारात घेतलेली बाजू अशी, संस्थेने दि. ०३-१२-२००३ च्या परिपत्रकानुसार प्रत्येक नव्या अभ्यासक्रमाबातच नव्हे तर अशा अभ्यासक्रमाच्या प्रत्येक तुकडी (बॅच) सुरू करण्याआधी डायरेक्टर जनरल ऑफ शिपिंग यांच्याकडून पूर्वानुमती घेऊनच सुरू करणे आवश्यक होते. माहितीच्या अधिकारात मिळालेले उत्तर सुद्धा या बाबीची पुष्टी करत होते की, वेल्स कॉलेज ऑफ मेरिटाईम स्टडीज, चेन्नई येथून डिप्लोमा इन नॉटिकल सायन्स करणाऱ्या कुठल्याही विद्यार्थ्याला 'सीडीसी' प्रमाणपत्र मिळू शकणार नाही कारण हा कोर्सच शासनमान्य नाही. याबाबतचा नियम क्र ५(४) असे सांगतो की, शासन मान्यतेशिवाय असे अभ्यासक्रम ग्राह्य धरले जाणार नाहीत. याच कारणाने राष्ट्रीय आयोगाने प्रतिवादीस, सेवेत कसूर केल्याबद्दल दोषी ठरवले. वरील दोन्ही उदाहरणे यासाठी महत्त्वाची आहेत की न्याय हवा असेल तर आपल्याला तक्रार दाखल करावीच लागेल. शिवाय यातून हेही स्पष्ट होते की, आपली सत्याची बाजू ठामपणे मांडल्यास, राष्ट्रीय आयोगापर्यंत पोहोचून अपील दाखल केले असता न्याय मिळतो. फक्त ग्राहकाने जागरूक राहण्याची गरज आहे.

शब्दकोडे-१८६



आडवे शब्द

१. अवेळी, अपेक्षित नसताना ३. सन्मानाची रक्कम ७. कोर्टातील दावा ९. अमावस्या १०. काही कामधंदा नसलेल्या माणसाला मिळणारे विशेषण १३. त्रिगुणांपैकी प्रामुख्याने आढळणारे दोन १५. फूल, पुष्प १६. पोकळ दाणा, टरफल, असत्य १७. वाचा १८. सीताहरण करणारा १९. नारळाचे झाड २०. बातमी, समाचार २१. गावकारभारी २३. हस्ते परहस्ते २४. विष २५. बदल २६. दहावा ग्रह! २८. फरक, तफावत २९. सत्ता ३०. घोडे बांधण्याची जागा ३१. नशा अणणारा पदार्थ ३३. साखरेचा रस ३५. धेनू ३६. लाकूड कापण्याचे साधन ३८. मराठीत प्लॅटफॉर्म ४०. बरोबर आलेला फौजफाटा ४१अ. ढीग, चवड ४३. लापशी ४४. मरेपर्यंत ४७. बढाईचा बडबड ४८. रोखलेली नजर ५०. पक्ष्यांचा समूह ५१. जंगलातील वाट ५४. बारीकासारीक ५६. सजीववनिर्जीव सर्व ५८. इन्शुरन्स (मराठी) ५९. अवधान ६१. चंद्र ६२. ओळखणे, समजणे, जाणणे ६३. अत्यंत गरजेच्या वेळी ६५. गोड्या पाण्यातील एक मासा ६६. उलटी, ओकारी ६८. तमाशातील कलाकार ६९. रवाळ ७०. सारंग आडनावाचा दिवंगत अभिनेता-दिग्दर्शक ७२. उपहास ७३. ताणलेल्या दोरीचा आवाज ७४. सावरण्याची गोष्ट ७५. उबग, कंटाळा

उभे शब्द

१. अधिकात देण्याचे वाण २. जून, निबर ३. कह्यात ४. धमनी ५. मुंबईतील या इमारतीवर अतिरेक्यांनी हल्ला केला ६. विषयांतर करणे ७. बारीक दगड ८. तमाशातील गीत ११. कर्णेंद्रिय १२. मनाचा ओढा १४. महाराष्ट्राची राजभाषा १७. बातमीदार २०. वधूवरांची सवाद्य मिरवणूक २१. समशेर २२. लहर, तरंग २३. हस्तलाघव, जादू २५. संगोपन करणारा २६. जागृत ठिकाण २७. मेहरबानी ३०. घट्टच्या विरूद्ध ३२. पदार्थ शिजतानाचा आवाज ३४. भांडण ३७. तोंडी व्यवहार ३९. दुःख ४१. व्यर्थ ४२. पोटाला लागलेली रग ४५. इजा, प्रहार ४६. बासरी ४७. जंगलातील प्राणी ४९. कुराणातील वचने ५२. पुरुष ५३. तापापूर्वीचे शहारे ५५. खिळे ठोकण्याचे साधन ५७. युवराज ५८. विनंती ६०. श्रेष्ठ पुरुष ६२. आच्छादन, कवच ६३. डाळिंब (हिंदी) ६४. इकडच्या गोष्टी तिकडे ६५. संतापी ६७. भिस्त ६८. काठ, भिंत ६९. हात ७०. ओढा, आवड ७१. संगनमत

शब्दकोडे १८५ चे उत्तर

आडवे उत्तर

१.सुदामा ६.आसपास ९.रास ११.दरसाली १३.वाट १४.राजधानी १६.नजरानजर १९.समा २०.नवीन २२.रसा २३.बजबजपुरी २६.रोज २७.फार २९.वल्लरी ३०.टर ३१.नख ३२.क्रय ३४.बखर ३६.बडबड ३८.जबरन ४०.हनुवटी ४२.भाकर ४४.सामान ४५.नहर ४६.चतकोर ४८.नकटी ५०.कळक ५२.साट ५४.रचना ५६.अफरातफर ५७.चाक ५८.भरत ५९.अवजड ६०.वणी ६१.शरद ६२.कीव ६३.स्तवन ६५.कलह ६७.परसदार ६९.पोकळ ७१.वरदान ७३.वारस ७४.मळा ७५.काक ७६.जन्म ७७.बोकड ७८.काळवीट ७९.वारसदार ८०.सावध ८१.केरळ

उभे उत्तर

१.सुदर्शन चक्र २.दार ३.मासा ४.आवरासावर ५.बळजबरी ६.आवा ७.सट ८.सरासरी ९.राधा १०.सनी डेज १२.लीन १५.जमा १७.जर १८.रज २१.नफा २४.बटबटीत २५.जरड २६.रोखठोक २८.रबर ३३.यजमान ३५.खनन ३७.बहार ३९.बनकर ४०.हरकत ४१.वचक ४२.भाग्य ४३.रपेट ४७.कोरफड ४९.टीचभर ५१.नतमस्तक ५२.सारवान ५३.अचानक ५५.नारद ५६.अजगर ५९.अवसर ६१.शहर ६२.कीरवा ६४.वळवळ ६६.लवकर ६८.दासबोध ६९.पोळा ७०.टकटक ७२.नजर ७४.मडके ७५.कावा ७८.काळ

सुशिक्षित बेरोजगारांना संधी कधी मिळणार?

१ नोव्हेंबर,२००५ पासून शासकीय सेवेत लागणाऱ्या सेवकांना निवृत्ती वेतन नाही. मग सांगा शिक्षण घेऊन नोकरी करून सुद्धा म्हातारपणी कुणाचा आधार घ्यावा असा प्रश्न कायम त्यांना सतावत असतो. मग कंत्राटी पद्धतीने होणाऱ्या सेवकांची काय दशा होईल, याचे वर्णन न केलेले बरे. तेव्हा सुशिक्षित बेकार आहेत. त्यांना आधार

देणे आवश्यक आहे. याचा परिणाम दारिद्र्यरेषेखालील लोकांची सुद्धा संख्या वाढेल. तेव्हा राज्यातील राज्यकर्त्यांनी राज्यातील सुशिक्षित बेकारांकडे दुर्लक्ष करून विकास कामांकडे लक्ष देऊन राज्याचा विकास होणार नाही, तर राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना त्यांनी घेतलेल्या पदवीप्रमाणे किमान वेतन देणारा रोजगार त्यांना दिला गेला पाहिजे, तरच राज्याचा विकास होऊ शकतो.

एक शासकीय सेवक घर संसार सांभाळून गाव व पाहुणे मंडळी सांभाळीत असतात. इतकेच नव्हे, तर एखाद्याच्या सुखदुःखात एकमेकांना मदत करतात. पगार जरी पाच किंवा सहा अंकी असला तरी जवळ जवळ त्यातील तीस टक्के पगार शासन दरबारी जातो. उरलेल्या पगारात मुलांचे शिक्षण, घराचा हप्ता, आजारपण, कपडालत्ता आणि उत्सव वर्गणी मग आता शिल्लक किती? यात अनेक कर्जबाजारी झालेले दिसतात, तर काही व्यसनाच्या आहारी गेले. तेव्हा विकासासाठी प्रथम बेकारांना कामधंदा दिला पाहिजे. जर देता आला नाही तरी महागाईच्या निर्देशांकानुसार त्यांना बेकारी भत्ता दिला गेला पाहिजे. मग बघा कसा विकास होतो ते. राज्याच्या विकासासाठी कंत्राटी नोकरभरती फायदेशीर नाही, तर किमान वेतन देऊन नोकरीची शाश्वतीही देता आली पाहिजे. आज ज्या घरफोड्या व लुटमार होतात हे त्याचेच उदाहरण आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, देशात किंवा राज्यात सुशिक्षित बेरोजगारांची क्रूर थट्टा चालली आहे. तेव्हा आपल्या राज्याच्या विकासासाठी हे चित्र बदलणे आवश्यक आहे. एक व्यक्ती एक पद,आरक्षणाची अंमलबजावणी आणि निवृत्तीनंतर निवृत्तिवेतन, तरच सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळून आपला भारत देश बलवान होईल. त्यासाठी देशातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी मिळणे गरजेचे आहे. **(पूर्ण)**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

खंडित वीजपुरवठ्यामुळे अंबडचे उद्योजक आक्रमक

सब स्टेशनवर धडक: दोषी अधिकाऱ्यांच्या हकालपट्टीची मागणी

उद्योग वसाहतींना वीज पुरवठा प्राधान्यक्रमाने करणे गरजेचे असतानाही त्याचे गांभीर्य नसलेले लोक भरले कसे? असा आमचा महावितरणच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांना सवाल आहे. गुरुवारी वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर पॉवर सप्लाय गेला असेल असे असंवेदनशील उत्तर आम्हाला मिळाले. आम्ही प्रीमियर रेटने वीज पुरवठा घेतो. विनाखंड आणि गुणवत्तापूर्वक वीजपुरवठा व्हावा हा त्या मागचा खरा उद्देश असतो. परंतु असे असतानाही पूर्वसूचना न देता दीर्घकाळ वीज पुरवठा खंडित राहतोच कसा? आमच्या खरा सवाल आहे. या गोष्टीस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची त्वरित हकालपट्टी झाली पाहिजे. उद्योजकांचे तीनशे कोटी रुपयांचे नुकसान झाले असून ही निश्चितच गंभीर बाब आहे. शुक्रवारी सकाळी आम्ही उपकेंद्राला भेट दिली असता तेथे एकही अधिकारी हजर आढळला नाही हे तर आश्चर्यच म्हणावे लागेल. या संपूर्ण प्रकरणाची सर्वंकष चौकशी झाली पाहिजे. – निखिल पांचाळ, अध्यक्ष : अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

नाशिक । प्रतिनिधी

अंबड औद्योगिक वसाहतीत गुरुवारी दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित राहिला, त्यानंतरही विजेचा लपंडाव सुरू असल्याने संतप्त झालेल्या उद्योजकांनी आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ यांच्या नेतृत्वाखाली १३२ केवी उपकेंद्र गाठले. मात्र तेथे कुणीच जबाबदार अधिकारी न आढळल्याने आणि उपस्थित कर्मचाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने उद्योजकांनी पायऱ्यांवरच ठिय्या मांडून आपला निषेध नोंदवला. त्यानंतर आलेल्या अधिकाऱ्यांनी उद्योजकांची समजूत काढल्यानंतर ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र वीज पुरवठ्याच्या सवल्यात गोंधळास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची त्वरित हकालपट्टी करावी या मागणीवर उद्योजक हटून बसल्याने त्यांच्यावर निश्चितच कारवाई केली जाईल, असे आश्वासन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर उद्योजकांनी आंदोलन मागे घेतले. यापुढे विद्युत पुरवठा खंडित राहिल्यास उद्योजक एक महिन्याचे बिल भरणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

उद्योजक हा देशाच्या विकासाचा कणा आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर उद्योजकांना आपापल्या मालाच्या उत्पादनांच्या ऑर्डर पूर्ण करावयाच्या असल्याने उद्योजकांची त्यासाठी एकच धावपळ सुरु आहे. त्यासाठी त्यांना अखंड वीज पुरवठा हवा असतो. परंतु वीज मंडळाच्या आणि विशेषतः महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या गलथानपणामुळे गेल्या आठवड्यात सातत्याने वीज पुरवठा खंडित राहिला होता. उद्योजकांचे त्यामुळे अतोनात नुकसान झाले. गुरुवार दि. २१ सप्टेंबरला तर कळसच झाला. महावितरण कोणतीही पूर्व सूचना न देता अंबड औद्योगिक वसाहतीतील विद्युत पुरवठा दीर्घकाळ खंडित ठेवला.

दुसऱ्या दिवशीही त्यात काही सुधारणा झाली नाही. तर काल शुक्रवारी सकाळी अकरा वाजेपर्यंत विद्युत पुरवठा खंडित राहिल्याने आणि वारंवार विजेचा लपंडाव सुरू असतो हे लक्षात आल्याने संयमाचा बांध फुटलेल्या उद्योजकांनी थेट १३२ केवी उपकेंद्र गाठले. तिथे कुणी जबाबदार अधिकारी न आढळल्याने पायऱ्यावर बसूनच अधिकाऱ्यांची वाट बघणे आंदोलन सुरू केले. यानंतर आलेल्या अधिकाऱ्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने उद्योजकांनी त्यांना अक्षरशः धारेवर धरले. आम्ही प्रीमियम रेटने वीज बिल अदा करतो. सतत वीजपुरवठा बंद व वारंवार खंडित होत असल्याने उद्योगांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. अंबड व सातपूर औद्योगिक वसाहतीत विजेचा लपंडाव तर नित्याचेच झाले आहे. कोणतीही पूर्व सूचना न देता विद्युत पुरवठा खंडित होत असेल तर आम्ही उद्योग चालवायचे कसे? असा खडा सवाल करून पांचाळ यांनी अधिकाऱ्यांना चांगले धारावर धरले. दोन दिवसात आमचे तीनशे कोटीचे नुकसान झाले आहे ते कोण भरून देणार? उद्योग वसाहतींना प्राधान्यक्रमाने वीज पुरवठा करणे गरजेचे असताना येथील विद्युत पुरवठा खंडित का होतो? अशी विचारणाही त्यांनी केली. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून जोपर्यंत या घटनेस जबाबदार असलेले उपअभियंता अजय नागरे आणि कार्यकारी अभियंता ललित पाटील या दोन अधिकाऱ्यांना निलंबित करत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही असे त्यांनी ठणकावल्यानंतर कार्यकारी अभियंता प्रवीण भालेराव आणि चेतन वाडे यांनी त्यांची तसेच अन्य उद्योजकांची समजूत काढली. यापुढे विद्युत पुरवठा खंडित होणार नाही आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल आश्वासन त्यांनी दिल्यानंतर उद्योजकांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले. यापुढे वीज मंडळाच्या गलथानपणा आम्ही खपवून घेणार नाही आणि असा प्रकार घडल्यास आम्ही एक महिन्याचे वीज बिल भरणार नाही, असा इशारा आयमाच्या ऊर्जा समितीचे चेअरमन रवींद्र झोपे यांनी दिला. आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे आणि कुंदन डरंगे हेसुद्धा यावेळी खूप आक्रमक दिसले. खंडीत वीजपुरवठ्यामुळे अनेक उद्योगांची मशीनरी व उपकरणे जळून खाक झाली आहेत. घटनेचा जाब विचारण्यासाठी सब स्टेशनला भेट दिली असता तेथे नोंद रजिस्टर आढळले नाही. उलट आम्हाला उडवा उडवीची उत्तरे मिळाली. अधिकारी व कर्मचारी वर्गाची चौकशी करावी अशी मागणीही त्यांनी केली. यापुढे असा प्रकार घडल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही उद्योजकांनी दिला. यावेळी आयमाचे उपाध्यक्ष सुदर्शन डोंगरे, कुंदन डरंगे, गोविन्द झा, देवेंद्र विभुते, श्रीलाल पांडे, विश्वास कुदळ आदींसह आयमा, निमाचे सदस्य आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

न्यूज कॉलम

कंटेनर-टेम्पोची समोरासमोर धडक

नाशिक । नाशिक-मुंबई महामार्गावर एका ट्रकने मॅक्झिमो टेम्पोला धडक दिल्याने भीषण अपघात घडला आहे. या अपघातात बेलगाव कुऱ्हे येथील ३ जण गंभीर तर ४ जण किरकोळ जखमी झाले आहेत. वाडीवऱ्हेकडून अस्वलीच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकने बेलगावकडून वाडीवऱ्हेकडे येणाऱ्या मॅक्झिमो टेम्पोला धडक दिली. अपघातानंतर काही काळ महामार्गावर वाहतूक विस्कळीत झाली होती. दरम्यान, या अपघातात दत्तू लालू गुळवे , मंगला विठ्ठल शिंदे, मनीषा एकनाथ शिंदे, तुषार सावळीराम गवारी, रेखा सावळीराम गवारी, लक्ष्मी खंडू गवारी, सविता सुनील साळवे हे जखमी झाले आहेत. त्यांनतर या जखमींना रुग्णवाहिकेने नाशिकच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

कपाशीला मिळाला साडेसहा हजारांचा भाव

नाशिक । गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर येथे कापूस खरेदी सुरू झालेली आहे. खासगी व्यापाऱ्याने मुहूर्ताचा साडेसह हजार रूपये क्विंटल भाव दिला आहे. पहिल्या दिवशी सात क्विंटल कपाशीची खरेदी झाली. दरम्यान कपाशीला किमान आठ हजार रुपयांचा भाव मिळावा अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनच्या पाठपुराव्याला अखेर आले यश

नाशिक । प्रतिनिधी

गॅस पाईपलाईनच्या खोदाईमुळे विद्युत उपकरणांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेल्या प्रियंका पार्कमध्ये महावितरणने गुरुवारी नवीन केबल टाकली. पाठपुराव्याची दखल घेतल्याबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनने महावितरणच्या अधिकारी, कर्मचार्यांचे आभार मानले आहे.

गॅस पाईपलाईनसाठी खोदाई करताना तुटलेली विद्युत केबल न जोडताच खड्डे बुजवून टाकण्यात आले आहेत. पाणी गेले किंवा वाहनांच्या वर्दळीमुळे त्याच ठिकाणी आणखी केबल तुटल्यानंतर अचानक विद्युत दाब वाढतो. घरातील बल्बचे स्फोट होवून नुकसान होते. प्रभाग २४ मधील प्रियंका पार्क भागात रविवारी पहाटे तीन ते पाच दरम्यान घरांमध्ये बल्बचे स्फोट झाले. टीव्ही, फ्रीज, लॅपटॉप यासह विद्युत उपकरणांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. नागरिक भयभीत झाले होते. २४ तास विद्युत पुरवठा खंडीत होता. खोदाई करणार्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख) यांच्यासह रहिवाशांनी महापालिकेकडे निवेदनाद्वारे केली. अशी घटना पुन्हा झाल्यास महापालिका व वीज वितरण कंपनीविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला होता. बुधवारी वीज वितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रवीण वट्टमवार, उपअभियंता विशाल मोरे, तंत्रज्ञ किशोर वाघ, लाईनमन गोकुळ सोनवणे यांनी रहिवाशांची भेट घेतली. नुकसानीची पाहणी करून माहिती घेतली. तर गुरुवारी नवीन केबल टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले. या सर्वांचे बाबासाहेब गायकवाड (देशमुख), चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, मयुर आहेर, धवल खैरनार, संगिता देशमुख, प्रभाकर खैरनार, रवींद्र सोनजे, विनोद पोळ, बाबुराव चौधरी, डॉ. सुनील चौधरी, मुकुंद रनाळकर, भूषण देशमुख, दिनेश खळदकर, पल्लवी रनाळकर, सविता महाले, कुसुम खळदकर, सोनल आहिरे, सोनाली चौधरी, अनुराधा रनाळकर आदींनी आभार मानले.

महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक सेना पदाधिकाऱ्यांचा दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

नाशिक । प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्याच्या जनतेसाठी १८-१८ तास काम करत अनेक लोकाभिमुख शासन निर्णय घेत आहेत. सर्वसामान्य जनतेसाठी मुख्यमंत्री व शिवसेना पक्ष करत असलेल्या कामाने प्रेरित होऊन मनसेच्या सर्व पदाधिकारी यांनी शिवसेनेत प्रवेश केला असल्याचे प्रवेशकर्त्यांनी सांगितले.

या प्रवेशकर्त्यांमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक सेनेचे राज्य सरचिटणीस प्रकाश सोनवणे, शिक्षक परिषद नाशिक महानगर कार्याध्यक्ष, मनसे शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष प्रकाश वाघ तसेच राजेद्र आहिरे, राजेंद्र जाधव, एन. बी. आहेर, संजय बिरारी, रविंद्र बेडसे, वाय. झेड. पाटील, बी.एन. पवार, विजय पवार, दातु भोये, दिलीप भामरे, गोरख पगार, सुभाष पवार यांच्यासह मनसे शिक्षक सेनेचे विविध पदाधिकारी सदस्य तसेच नासिक जिल्हा व इतर असंख्य कार्यकर्ते यांनी शिवसेनेत प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेना सह संपर्क प्रमुख चंद्रकांत लवटे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, उप जिल्हाप्रमुख शामकुमार साबळे, शशिकांत कोठुळे, प्रमोद लसुरे, अमोल सूर्यवंशी, विधानसभा प्रमुख बाबुराव आढाव, युवा सेना विस्तारक योगेश बेलदार, जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, महानगर प्रमुख दिगंबर नाडे, अभय महादास, भिवानंद काळे, दिलीप अहिरे, सनी रोकडे, आकाश पवार आदी उपस्थित होते.

वृक्षतोड प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेची मागणी

सिडको । प्रतिनिधी

अंबड औद्योगिक वसाहतीतील आरक्षित असलेल्या मोकळ्या भूखंडावर असलेली शंभरहून अधिक मोठी वृक्ष तोडण्यात आली असून याबाबत प्रादेशिक अधिकारी, कार्यकारी अभियंता, भूखंड विकसक व वृक्षतोड करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हे दाखल करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आली आहे.

अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या मोकळा भूखंड हा पूर्णपणे वृक्षरोपण करण्यासाठी शासनाने आरक्षित ठेवला आहे. परंतु असे असतानाही या ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून जुने मोठी वृक्षही तोडण्यात आले असून याबाबत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी शिवसेना ठाकरे गटाचे विभाग प्रमुख शरद दातीर यांनी केली आहे.

येथील मोकळा भूखंड हा पूर्णपणे वृक्षारोपण करण्यासाठी आरक्षित करण्यात आला होता. त्या भूखंडामध्ये २० ते २५ वर्ष जुनी निलगिरी, उंबर, वड, गुलमोहर, करंज, पापडी, काशीद, बाभूळ व अन्य १५० पेक्षा जास्त मोठ-मोठी झाडे एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांच्या परवानगीने तोडण्यात आली. वृक्षारोपणासाठी आरक्षित ओपन स्पेसचे आरक्षण बदलून उद्योजकांना देण्यात येऊ नये व वृक्ष तोड कायमची बंद करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तरी मऔविमचे प्रादेशिक अधिकारी, कार्यकारी अभियंता व भूखंड विकसक यांच्यावर गुन्हे दाखल करा अशी मागणी शिवसेना महिला आघाडी ठाकरे गटाच्या जिल्हा समन्वयक मंदाताई दातीर व शाखाप्रमुख शरद दातीर यांनी केली आहे.

अशोक नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी

नाशिक । प्रतिनिधी

श्री अशोक नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २४ रोजी सकाळी १० वाजता, माहेरघर मंगल कार्यालय, खुटवडनगर, नाशिक येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. निलेश कुंभारे यांच्या अध्यक्षतेखाली माहेरघर मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक सोनजे, सचिव रमाकांत अलई, सतीश वाणी, सुभाष कोठावदे, दत्तात्रय मेतकर, मधुकर कोतकर यांनी दिली.

या सभेस जास्तीत जास्त सभासदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जितेंद्र येवले, दत्तात्रय कोठावदे व संचालक मंडळाने केले आहे. यंदाचा भक्त पुंडलिक पुरस्कार प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक अशोक सोनजे व अलका सोनजे या परिवाराला प्रकाश अमृतकर परिवाराकडून दिला जाणार आहे.

Exh. 10

Public Notice

In the Court of Hon'ble Civil Judge Sr. Dn. Dhule, at Dhule

Reg. Civil Suit 294/2023

Mayadevi Agnihotri) Plaintiff
v/s
Anil Agnihotri) Defendant

As Smt. Mayabai Chhaganprasad Agnihotri has filed the suit for declaration of civil death of Anilkumar Chhaganprasad Agnihotri and for mandatory injunction before the Civil Judge Senior Division Dhule, at Dhule bearing its number as R.C.S. No. 294/2023.

It is hereby informed that, if anyone has any objection or grievance, he/she may appear and file written statement on 26/10/2023 before Civil Judge Junior Division, Dhule at Dhule, failure to which may lead to grant of the appropriate order in the suit in favor of the plaintiff. On consideration that none raised any objection to the suit claim.

Hence, this notice is published through court.

Dhule
Date: 16/09/2023

Seal

Clerk Civil Judge Jr. Dn., Dhule
Office Superintendent Civil Judge Jr. Dn., Dhule

ॲड. भवेश भ. वाघमारे
निशाणी नं. ०६

जाहिर नोटीस
धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११३९/२०२३

दिपाली राहुल बडगुजर वगैरे ...अर्जदार
वि.
निरंक ....जाबदेणार
राहुल अशोक बडगुजर .... मयत

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. ३ सो. धुळे यांचे कडे दि. १८/०९/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि. दि. अर्ज क्र. ११३९/२०२३ चा अर्ज राहुल अशोक बडगुजर यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकिय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयांतुन अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. २७/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वैगरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काहि वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कोर्ट नं ३ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थीत राहुन हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण: धुळे
दि.२०/०९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे
अधिक्षक दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे

प्रोसेस पेड **ॲड. राकेश अशोक मोरे**
निशाणी नं. ०६

जाहिर नोटीस
धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क स्तर यांचे कोर्टात
दिवाणी कि. अर्ज. नं. ११३५/२०२३

१) श्रीमती प्रमिलाबाई प्रधान महाजन
रा. मु. पो. कापडणे, ता. जि. धुळे, ह.मु. ४६, अंबावाडी, गजानन सोसायटी, जवळ, अंकलेश्वर
२) श्री. वसंत प्रधान महाजन
रा. मु. पो. कापडणे, ता. जि. धुळे, ह.मु. ७८, संजय नगर, अंकलेश्वर, (गुजराज राज्य)
३) सौ. सुरेखाबाई जिभाऊ सुर्यवंशी
रा. जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ, अकलाड (मोराणे) प्र. नेर, ता. जि. धुळे,
४) सौ. छायाबाई मनोज महाजन
रा. २२६, महादेव नगर ३, साई मंदिर जवळ, डिंडोली, उधना, सुरत, गुजरात राज्य,
५) सौ. कल्पनाबाई अभिमन महाजन
रा. १०९, श्रीहरी नगर, नवागांम डिडोली उधना, सुरत, गुजरात राज्य,
६) सौ. भारती प्रविण माळी
रा. ७, हुलेसिंग नगर, करवंद नाका, शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे, ...अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ...सामनेवाला
कै. प्रधान चांगो महाजन ..... मयत
कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी
(Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ६ यांनी मयत प्रधान चांगो महाजन यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ८ यांचे कोर्टात दिनांक २६/१० /२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत/ प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत प्रधान चांगो महाजन यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि.२०/०९/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का

कामगिरी कारकुन दिवाणी न्यायालय व. स्तर, धुळे
अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर, धुळे

न्यूज कॉलम

चांदणे यांची स्विकृत सदस्यपदी निवड

चिमठाणे । येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी चंद्रकांत ज्ञानेश्वर चांदणे यांची २०२३-२४ या वर्षा साठी धुळे जिल्हा परीषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या शिंदखेडा शाखेच्या स्विकृत सदस्य म्हणून अध्यक्ष डी. ए. पाटील व उपाध्यक्षा रुपाली पाटील यांनी नियुक्ती केली आहे. चंद्रकांत चांदणे हे नेहमी रुग्ण सेवा ही ईश्वर सेवा मानत असतात. तसेच आरोग्य केंद्रात ऑपरेशन साठी बाहेर गावाहून येणारे रुग्ण महिला चहा ,भिस्कीट ,नास्ता देखील व्यवस्था करत असतात. त्यांच्या या नियुक्ती बद्दल चिमठाणे सह परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पांझरेजवळील रस्त्याची डागडुजी

धुळे । शहरातील पांझरा नदीच्या पुलाकडून नकाणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडलेले होते. या खड्ड्यांमुळे वाहने चालविणे कठीण झाले होते. तसेच किरकोळ अपघातही होऊ लागले होते. अखेर महानगरपालिकेच्या वतीने या रस्त्याची डागडुजी करण्यात येत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

दुधात भेसळ आढळलेल्या विक्रेत्यांवर कारवाई

धुळे । प्रतिनिधी

धुळे जिल्ह्यात दुध व दुग्धजन्य पदार्थातील भेसळ रोखण्यासाठी जिल्हास्तरीय समन्वय समितीची स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या संयुक्तीक पथकांने आज दुधात पाण्याची भेसळ, अनैसर्गिक वास-चव, अस्वच्छता आढळलेल्या दुध विक्रेत्यावर कारवाई केली असल्याची माहिती दूध भेसळ नियंत्रण समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी डॉ.अमित पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. ही कारवाई समितीचे अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.आर.एम.शिंदे, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी डॉ.अमित पाटील, अन्न सुरक्षा अधिकारी के. एच.बाविस्कर, , निरिक्षक वैधमापन शास्त्र संतोष दलाल, आर.सी.पाटील,सहायक जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी व्ही.व्ही.गरुड, विस्तार संकलन प्रितेश गोंधळी, मुकेश तमायचेकर, वैधमापन शास्त्राचे क्षेत्रसहायक कृष्णा नेरकर, तसेच पोलीस प्रशासनातील त्या-त्या परिक्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने ही तपासणी केली.

दिनांक १५ सप्टेंबर,२०२३ ते २१ सप्टेंबर,२०२३ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मोहिमेत धुळे शहरी भागात व धुळे शहराला लागुन असलेल्या ग्रामीण भागातील दूध विक्री संकलन करुन विक्री करणाऱ्या डेअरी तसेच दूध पुरवठा फेरीवाले यांचेकडील दूधाची तपासणी स्वयंचलित उपकरणाद्वारे करण्यात आली. सदरच्या धडक कारवाई मध्ये एकुण ३० दूध विक्रेत्यांच्या एकुण सरासरी २७ हजार ७०२ लीटर दूधाच्या विविध साठ्यातील नमुन्यांची कार्यवाहीस्थळी तपासणी केली असता, त्यापैकी एकुण १५ दूध विक्रेत्यांच्या काही दूधात पाण्याची भेसळ, अनैसर्गिक वास-चव, मृत किटक, अस्वच्छता, गंजलेली दूध हाताळणी भांडी आढळुन आलेली आहे. भेसळ आढळून आलेले सरासरी एकुण ९४६ लीटर (गाय दूध ११० लीटर, म्हैस दूध ४३६ लीटर, मिक्स दूध ४०० लीटर) दूध नष्ट करण्याची कारवाई तात्काळ करण्यांत आली. त्याचप्रमाणे वडजाई रोड परिसरातील सांबर डेअरी येथे गंजलेल्या कॅनमध्ये साठवुन ठेवलेले दहीची पाहणी केली असता गंजामुळे दुषीत झालेल्या दह्याव्दारे सामान्य नागरीकांच्या आरोग्यास होणारा संभाव्य धोका टाळण्यासाठी ८० लीटर कॅनमधील दही नष्ट करण्याची कारवाई तात्काळ करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत भेसळ आढळुन आलेल्या दूधाचे ०५ नमुने तपासणीकरीता पाठविण्यांत आलेले असुन शहरातील व ग्रामीण भागातील एकुण २ दूध विक्रेत्यांकडे खाद्यपदार्थ विक्री परवाना नसल्याने घाऊक पुरवठादार तसेच किरकोळ विक्री करणाऱ्या अस्थापनेवर विनापरवाना विक्री व पुरवठा कारणाने खटला नोंदविण्यांत आला आहे. वैध मापनशास्त्र विभाग, धुळे यांच्या सोबत संयुक्त पथकाद्वारे दूध मोजण्याची मापे, इलेक्ट्रॉनिक तोलन यंत्र यांचे मुद्रांकनाची पडताळणी करण्यात आली असता, १३ दूध विक्रेत्यांच्या डेअरीतील/वापरातील वजन-मापे ही मुद्रांकन व पडताळणी उल्लंघन आढळुन आल्याने वैध मापनशास्त्र अधिनियम २००९ अंतर्गत खटले नोंदविण्यांत आला आहे.

धुळे जिल्ह्यातील दूध विक्रेते व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, दूध व दुग्धजन्य पदार्थात भेसळ करणे व भेसळ नियंत्रण मोहिमेस मज्जाव करणे हा कायद्याने गुन्हा आहे. सदरची दूध भेसळ नियंत्रण समितीची धडक कारवाई यापुढेही अशीच सुरू राहणार आहे. त्यामुळे दूध पुरवठादार व दूध विक्रेत्यांनी पाणी किंवा कुठल्याही प्रकारची भेसळ न करता, स्वच्छ दूध हाताळणी व स्वच्छ कार्यपध्दतींचा अवलंब करुन विनाभेसळ दूध वितरण करावे. पशुपालकांनी व दूध पुरवठादारांनी स्वच्छ दूध धुण्याच्या पद्धतीचा वापर करावा. तसेच दुषीत दुग्धजन्य खाद्यपदार्थाच्या सेवनाने अनेक जिवाणुजन्य आजार जसे धनुर्वात, आकडी, लकवा, अतिसार, टाईफाईड, कॉलरा, हिपॅटायटीस इत्यादी गंभीर आजार होऊ शकतात. अशा भेसळयुक्त दुषीत दूध व दुग्धजन्य खाद्यपदार्थाद्वारे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्यांस भविष्यात दंडनिय व कायदेशीर करवाईस सामोरे जावे लागेल. धुळे शहरातील जागरुक नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, दूध भेसळ संदर्भात काही तक्रारी असल्यास जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,धुळे कार्यालयाच्या ववे. वर्हीश्रशसारळश्र.ले या ईमेलवर किंवा दुरध्वनी क्र. ०२५६२-२३५९२४ याव्दारे किंवा जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, चक्करबर्डी रोड, धुळे येथे कळविण्यांत यावी, असे आवाहन दूध भेसळ नियंत्रण समितीच्या पथकाद्वारे करण्यात येत आहे.

टोकडे ग्रामस्थांच तहसील कार्यालयात नटसम्राट स्टाईल आंदोलन

अधिकाऱ्यांनी लागलीच केली तलाठी नेमणूक

मालेगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील टोकडे हे गाव तीन वर्षांपासून महसूल सजा गाव झाले असून तेव्हापासून येथील तलाठी पद रिक्त आहे. कायमस्वरूपी तलाठी नेमण्याची टोकडेच्या ग्रामस्थांची अनेक वर्षांपासून मागणी आहे. टोकडे हे गाव महसूल सजा असुनही तलाठी उपस्थित राहत नसल्यामुळे कामकाजासाठी ग्रामस्थांना अतिरिक्त कार्यभार असलेल्या तलाठ्याकडे दुस-या गावी चकरा माराव्या लागत होत्या. यामुळे वेळ व पैशाचा अपव्यय होत ग्रामस्थांची प्रचंड गैरसोय होत होती. तलाठी नेमणूक करण्यात यावी अशी मागणी वेळोवेळी स्मरणपत्र निवेदनाद्वारे करण्यात येत होती. वेळोवेळी प्रत्यक्ष भेटून व निवेदन देऊनही केवळ आश्वासन दिले जात होते. शेवटी सामाजिक कार्यकर्ते विठोबा द्यानद्यान यांच्याकडे ग्रामस्थांनी कैफियत मांडल्यानंतर द्यानद्यान यांनी टोकडे येथे जावून ग्रामस्थांसह मालेगाव तहसील कार्यालय गाठत नटसम्राट फेम नाना पाटेकर स्टाईलने अधिका-यांचे लक्ष वेधल्याने एकच धावपळ उडाली.

अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेत दिर्घ कालावधीपासूनची तलाठी नेमणूकीची मागणी लागलीच पूर्ण केल्याचे लेखी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. द्यानद्यान यांच्या नेतृत्वाखाली टोकडे ग्रामस्थांनी केलेल्या या आगळ्यावेगळ्या आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आंदोलन यशस्वी होण्यासाठी उपसरपंच भाऊसिंग डिंगर सह ग्रामस्थ दशरथ लिद्दड, निळकंठ रंगी, स्टंटमॅन भगतसिंग फरस, विठोबा सुमराव, मनोज द्यानद्यान, सुभाष डिंगर, बळीराम डिंगर, काशिनाथ डिंगर, अनिल डिंगर, हेमंत फरस, राजेंद्र जिंझर, जवाहरसिंग संगेडा, मनोज दराखा, सुभाष द्यानद्यान, तुकाराम फरस, संजय रंधावा यांनी परिश्रम घेतले.

खलाणे येथे नवसाचा गणपती विराजमान

चिमठाणे । प्रतिनिंधी

शिंदखेडा तालुक्यातील खलाणे येथे श्री गणेशाचे रामराज्य ग्रुप तर्फे ढोल,ताश्याचा गजरात जल्लोष्यात स्थापना करण्यात आली. या मंडळा तर्फे दर वर्षी भजन,कीर्तन असे भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. रामराज्य ग्रुपचे भावसिंग गिरासे, कृष्णा राजपूत, कमलेश गिरासे, विकी वाल्हे, धीरज गिरासे, प्रफुल गिरासे, समाधान गिरासे, आकाश गिरासे, निशांत पाटील, पृथ्वीराज राजपूत,दुर्गेश गिरासे, केशव वाल्हे, जयू गिरासे, राजेंद्र गिरासे, पूरव गिरासे, लक्ष्मीकांत पाटील, देवेसिंग गिरासे, राकेश पाटील, संदीप वाघ, चंद्रसिंग गिरासे, मल्हारी पाटील, जयपाल राजपूत, आदी परिश्रम घेत आहेत.

शिवपुत्र गणेश मंडळ वीस वर्षापासून करतोय प्रबोधन

होळनांथे । प्रतिनिधी

होळनांथे येथील शिवपुत्र गणेश मित्र मंडळ हे गणेशोत्सवाबरोबरच सामाजिक कार्यातही अग्रेसर असून मंडळाकडून वर्षभर विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.

होळनांथे येथील स्टेट बँक परिसराचा राजा म्हणून ओळख असलेल्या शिवपुत्र गणेश मित्र मंडळाला वीस वर्ष पूर्ण झाले असून गणेश उत्सवाबरोबरच मंडळामार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. त्याचप्रमाणे वर्षभरात विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच प्रबोधनात्मक कार्यक्रम मंडळातर्फे आयोजित केले जात

असतात.यात मंडळाचे अध्यक्ष राज राजपूत, उपाध्यक्ष निशांत चौधरी, खजिनदार योगेश राजपुत आदींसह शिवपुत्र मित्र परिवाराचे सहकार्य लागत आहे.

वंदे मातरम प्रतिष्ठान गणेशोत्सवाची शालिनी भदाणे यांच्या हस्ते आरती

धुळे । प्रतिनिधी

वंदे मातरम प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी शहरात गणेशोत्वा निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

वंदे मातरम प्रतिष्ठानच्यादि. २० सप्टेंबर रोजी संध्याकाळच्या आरतीचा मान धुळे जिल्हा परिषद सदस्या शालिनी बाळासाहेब भदाणे यांना देण्यात आला. गणरायाची मनोभावे प्रार्थना करत सर्व शेतकरी, कष्टकरी जनतेला सुखी व समृद्ध, निरोगी आयुष्य मिळू दे ही प्रार्थना केली. यावेळी इतिहासकार व्याख्याते प्रा. नितीन बानुगडे पाटील, जिल्हा परिषद कृषी सभापती हर्षवर्धन दहीते,वंदे मातरम प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि.भरत वाघ, कृपेश नांद्रे विविध मान्यवर उपस्थित होते. वंदे मातरम प्रतिष्ठान तर्फे

शालिनी भदाणे यांचा सत्कार करण्यात आला. आज वंदे मातरम प्रतिष्ठान तर्फे प्राध्यापक नितीन बानगुडे पाटील यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

मुकेश आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये गणेश चतुर्थी निमित्त कार्यक्रम

शिरपूर । प्रतिनिधी

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई, संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई शाळेत गणेशोत्सव निमित्त विशेष प्रार्थनासभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांनी गणपतीच्या जन्माची कहाणी नाटिकेतून हुबेहूब साकारली.

भगवान शंकर, गौरीपार्वती, ब्रह्मदेव, नंदी व शिवगण यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उत्तम नाटिका सादर केली. सुरेल भक्तीगीता मधून बुद्धीची देवता असलेल्या गणेशाची आराधना यावेळी विद्यार्थ्यांनी केली.तसेच इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष आमदार श्री अमरिशभाई पटेल, संस्थेचे सहअध्यक्ष श्री भुपेशभाई पटेल, शिरपुरच्या नगराध्यक्षा श्रीमती जयश्रीबेन पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य श्री राजगोपाल भंडारी, एसव्हीकेएम स्कूल डायरेक्टर श्रीमती गिरीजा मोहन, शाळेचे प्राचार्य डॉ. जॉन लॉरेन्स यांनी सर्व विदयार्थी व शिक्षकांना गणेशचतुर्थी निमित्त शुभेच्छा दिल्या.

अरुण क्षीरसागर यांचा सेवापुर्ती गौरव समारंभ संपन्न

सामोडे । प्रतिनिधी

साक्री तालुक्यातील मौजे घोडदे येथे श्री बहिरमदेव एज्युकेशन सोसायटी संचलित म.ज्यो.फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घोडदे येथे आबासाहेब आदर्श शिक्षक पुरस्कर्ते तथा नेहरू युवा मंडळ जिल्हा युवा पुरस्कर्ते अरुण श्रावण क्षीरसागर यांनी निरपेक्ष व निस्वार्थीपणे शिक्षण क्षेत्रात एकूण ३८ वर्षे सेवा पार करून दि ३० जून २०२० रोजी सेवानिवृत्त झाले. परंतु हा समारंभ करोना सारख्या महाभयंकर संकट

अवघ्या जगावर होते म्हणून सदर कार्यक्रम करता आला नाही म्हणून घोडदे येथील अखंड हरीनाम व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा समारंभाचे औचित्य साधूसेवापुर्ती गौरव मालिका पुस्तक प्रकाशन संपन्न झाले.

या पुस्तिकेत त्यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्याची सखोल माहिती आहे. प्रकाशन झाल्यानंतर सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांना त्यांच्यातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी आमदार मंजुळा गावित, ह.भ.प श्यामसुंदरजी महाराज, कीर्तनकार ह.भ.प.योगेश महाराज, बहिरमदेव एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन कमलाकर पाटील, दिगंबर पाटील, शंकर क्षीरसागर, भटू क्षीरसागर, सरपंच अंजा पवार,उपसरपंच जयश्री क्षीरसागर तसेच ग्रामपंचायत सदस्य कांतीलाल पवार यांच्या शुभहस्ते सर्व ग्रामस्थांसमवेत पार पडला.

अतिक्रमण करणाऱ्यावर कारवाई करा : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाची मागणी

धुळे । प्रतिनिधी

शहरातील तिरंगा चौक येथील पुनम टॉवर मध्ये पार्किंगसाठी असलेल्या जागेवरील १२ दुकानांचे अतिक्रमण करण्यात आलेले आहे. पार्किंगसाठी जागा करून दिलेली नाही. सदरील १२ दुकाने हे केदारनाथ बधान यांचे असून योगेश चौधरी हा त्याला सांगतो की काही अतिक्रमण काढायचे नाही, पार्किंगला जागा द्यायची नाही, पुढचे मी बघून घेईल. व आजपर्यंत तेथे पार्किंग करून दिलेली नाही. तरी अतिक्रमण काढून पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाने केली आहे.

सदरील जागेवर जागेवर संजय कैलास अग्रवाल, शैलेश जिंदाल

अग्रवाल यांनी नाव लावून आता लोहार यांच्याकडून नाव काढण्यासाठी करोडो रूपयांची मागणी करीत आहे. अशा अनेक व्यवहारांमध्ये योगेश सुरेश चौधरी याने फकरुद्दीन अहेमद लोहार यांची फसवणूक केलेली आहे. योगेश सुरेश चौधरी याच्याकडे असे अनेक फसवे लोक आहेत. त्यांचा तसा एक गृपच आहे व ते विविध ठिकाणी अशाप्रकारे लोकांची फसवणूक करतात. लोकांना आमिष दाखवून, प्रॉपर्टीवर नाव लावून नंतर नाव काढण्यासाठी दमबाजी, धमकी, मारहाण, इत्यादी प्रकरणे करून लाखो / करोडो रूपयांची मागणी करतात. तसेच योगेश सुरेश चौधरी व त्याचे इतर अग्रवाल सारखे मित्र हे भूमाफिया म्हणून नावारूपास येत आहेत. तसेच त्यांनी असे अनेक जागा लुटलेल्या आहेत. आणि ज्या कुणी त्यांच्याविरूध्द आवाज उठविला किंवा पैशांची मागणी केली तर मात्र ते समोरच्याला मारहाण करतात, जिवे ठार मारण्याची धमकी देतात. अशाच प्लॉटच्या प्रकरणात जास्त पैसे दिसत असल्याने लोहार यांच्या अल्पसंख्याक जातीचा फायदा घेत, त्यांना तो जातीच्या नावाने ब्लॅकमेल करून घाबरवित होता. अशाने उपयोग नसल्याने तो त्यांच्या जिवावर उठला आहे. योगेश चौधरी कडून फकरुद्दीन अहेमद लोहार यांच्या जीवाला धोका आहे. लोहार हे वयोवृध्द असल्याने त्याचा फायदा घेत तो त्यांना शारिरीक बळाचा वापर करून संपविण्याचा प्रयत्न करीत आहे. योगेश सुरेश चौधरी हा सराईत गुन्हेगार असून पोलिस स्टेशनला जाऊन खोटी तक्रार दाखल करून आला व पोलिसांनीही त्याच्या बनावट तक्रारीवर विश्वास ठेवून एकतर्फी, काही शहानिशा न करता तक्रार नोंदवून घेतली. वास्तविक योगेश सुरेश चौधरी हा फकरूद्दीन अहेमद लोहार यांच्या थोरल्या मुलाचा मित्र असल्याने लोहार यांनी त्याला अनेक व्यवहारात मध्यस्थी केले. परंतु त्याने पैशांच्या लोभापोटी लोहार यांची मोठी आर्थिक फसवणूक केली आहे. तरी यांच्या कारवाई करण्यात यावी अशी मागणी केंद्रिय सरचिटणीस जिभाऊ, एम.जी. धिवरे, जिल्हाध्यक्ष सुरेश बैसाणे, जिल्हा विधी सल्लागार ॲड. सुरेश बागले, जिल्हा उपाध्यक्ष नरेश दामोदर, जिल्हा सरचिटणीस रत्नशिल दगा सोनवणे, शहर जिल्हा उपाध्यक्ष सुरेश रामचंद्र दामोदर आदी पधाधिकऱ्यानी केली आहे.

विवाहितेचा छळ, आठ जणांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा

सिडको । प्रतिनिधी

पहिल्या पतीच्या मुलांच्या कारणावरून वाद घालून विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी महिलेचे नाशिक येथे माहेर आहे. ही विवाहिता दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ११ ऑगस्ट २०२२ या कालावधीत राहाता येथे सासरी नांदत होती. त्यावेळी पती साईराम गोविंदराव गोंदकर (वय ४४), सासू इंदुबाई गोंदकर (वय ६०), दीर सतीश गोंदकर (वय ४७), श्रीराम गोंदकर (वय ४८), जाऊ रोहिणी गोंदकर (वय ४४), वैशाली गोंदकर (वय ४४), श्रुती साईराम गोंदकर (वय १९), कोमल सतीश गोंदकर (वय २३, सर्व रा. पिंपळवाडी रोड, शिर्डी, ता, राहाता, जि. अहमदनगर) यांनी संगनमत करून पीडित विवाहितेच्या पहिल्या पतीपासून झालेल्या मुलांच्या कारणावरून वारंवार वाद घालून शिवीगाळ व मारहाण केली. तसेच पतीने अनैसर्गिक कृत्य करून शारीरिक व मानसिक छळ केला. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

सोनपावलांनी गौरी आल्या! घरोघरी सजल्या गौराई, आकर्षक रोषणाई

अनेकांच्या घरात ज्येष्ठा गौरींचं आगमन : देखावे साकारले : गृहिणींचा उत्साह

धुळे

।अनेकांच्या घरात ज्येष्ठा गौरींचं आगमन झालं आहे. गौरींसमोर घरात मोठे मोठे देखावे साकारले जातात. झिम्माफुगडीच्या तालावर शहरातील पाणवठ्यांवरून वाजत गाजत गौरीचे डहाळे घेऊन आलेल्या माहेरवाशिणींसह मुलींचे औंक्षण करून सुवासिनींनी देव्हाऱ्यावर गौरीला विराजमान केले. मुखवट्यासह सजलेल्या गौरी उभारण्यासाठी गृहिणींचा उत्साह ओसंडून वाहू लागला. दागिन्यांनी मढलेल्या आणि मांगल्याचा साज ल्यालेल्या गौरीला आल्यापाल्याची भाजी, पाटवडीभाकरीचा नैवेद्य दाखवण्यात आला. नव्या साड्या नेसून, दागदागिन्यांनी गौरीला सजविले जाते. गौरीची खणा-नारळाने ओटी भरली जाते. गौरीला नैवद्यात करंजी, पुरणपोळी, खीर, सोळा भाज्या, कढी आदी बेतदेखील आखला जातो. दुपारी साग्रसंगीत नैवद्य झाला की संध्याकाळी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम सुरू होतो. फुलांच्या, दिव्याच्या माळा, अखंड तेवत राहणारी समई, सुबक रांगोळ्या अन् रात्रभर उखाणे, झिम्मा-फुगड्यांचा फेर तर काही ठिकाणी भजनाचे कार्यक्रमदेखील आयोजित केले जातात. तिसऱ्या दिवशी मूळ नक्षत्रावर गौरी माघारी निघते. तिला दही-भाताचा नैवद्य दाखवला जातो. आरती केली जाते आणि गौरी सासरी जाण्यासाठी निघते.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

धुळ्यातील गणेश मंडळांच्या आकर्षक देखण्या मूर्ती

मंडळांकडून धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

शहरातील जुने अमळनेर स्टॅण्ड जवळील नवराष्ट्र गणेश मंडळ

सिंहासनावर विराजमान गणेशमूर्ती

पंचवटी मित्र मंडळाचा देखावा

शिवसेना शाखा क्र. १ जय भवानी मित्र मंडळ

पंचवटी मित्र मंडळाचा देखावा

शिवनेरी चौक: मरीमाता गणेश मित्र मंडळ

रामदास तालमीचा मानाचा गणपती

श्री अष्टविनायक मित्र मंडळ

धुळे । धुळे शहरात विविध रुपातील बाप्पांच्या मूर्ती आकर्षणाच्या केंद्रबिंदू आहेत. शहरात गणेश मंडळांकडून विविध रुपातील बाप्पांची मूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे. अनेक यावेळी अनेक मंडळांकडून धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यामध्ये भाविक मोठ्या संख्येने सहभागी होताना दिसत आहे. शहरातील मंडळांनी केलेले आकर्षण देखावे पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होऊ लागली आहे.गणेश मूर्ती आणि सजावट पाहण्यासाठी भाविक मोठी गर्दी दिसून येते आहे. अतिशय खास पद्धतीने सजावट करण्यात येत असल्याने देखील भाविकांची आरतीवेळी मोठी गर्दी होते. प्रबोधनात्मक आणि धार्मिक देखावे गणेशोत्सवाचे खास आकर्षण असते. समाजाला एकत्र करण्यासाठी सुरू झालेल्या गणेशोत्सवाने कलाकारांचे व्यासपीठ म्हणून ओळख मिळवली. ज्येष्ठ कलाकारांच्या सादरीकरणाचा आनंद रसिकांना देण्यापासून ते नवोदितांना प्रोत्साहन देण्याचे काम गणेशोत्सवाने केले.

संकलन : दिपक वाघ